नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. ०४/०८/२०२६

पुणे महानगरपालिका
मा.महिला व बालकल्याण समिती
दाखल कार्यपत्रिका क्र. ०७

विषय क्र. १०९ त्वर्य

पुणे महानगरपालिका समाज विकास विभागाकडील योजनेच्या लाभाकरीता असलेली उत्पन्न मर्यादेच्या अटीमध्ये वाढ करणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/३७२,दि.०४/०८/२०२६ चे पत्र.

विषय क्र. ११० त्वर्य

मा. सौ.ऐश्वर्या सम्राट थोरात व मा.सौ.तन्वी प्रशांत दिवेकर यांचे दि.०४/०८ /२०२६ रोजीचे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना मासिक पाळीच्या काळात आवश्यक स्वच्छता सुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांचे आरोग्य, स्वच्छता व शालेय उपस्थिती सुधारावी तसेच सन्मानपूर्वक शैक्षणिक वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने शिक्षण विभागाच्या सर्व शाळांमध्ये सॅनिटरी पॅड व्हेंडिंग मशीन व सॅनिटरी पॅड डिस्पोजल (इन्सिनरेटर) मशीन बसविण्यात यावेत. तसेच यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून मशीनची देखभाल, पॅडचा नियमित पुरवठा व जनजागृतीची जबाबदारी संबंधित विभागास देण्यात यावी.

विषय क्र. १११ त्वर्य

मा. सौ.अल्पना गणेश वरपे व मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि.०४/०८ /२०२६ रोजीचे पत्र.

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अल्प उत्पन्न गटातील अनेक गर्भवती महिला व स्तनदा मातांना आवश्यक पोषण आहार उपलब्ध होत नसल्यामुळे माता व बालकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. निरोगी माता व सुदृढ बालक घडविण्यासाठी गर्भधारणेच्या काळात व प्रसूतीनंतर योग्य पोषण मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने पुणे महानगरपालिकेमार्फत अल्प उत्पन्न गटातील पात्र गर्भवती व स्तनदा मातांसाठी "पौष्टिक आहार (बाळंतविडा) योजना" सुरु करण्यात यावी. या योजनेअंतर्गत पुणे महानगरपलिकेच्या आरोग्य विभागामार्फत पौष्टिक आहाराचे घटक निश्चित करून, पात्र लाभार्थ्यांची नोंदणी निश्चित करण्यात यावी.

तरी सदर योजना पुणे मनपाच्या समाज विकास विभागामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात यावी.

<u>विषय क्र. ११२ त्वर्य</u>

मा. सौ.अर्चना तुषार पाटील व मा. सौ.कोमल समीर शेंडकर यांचे दि.०४/०८ /२०२६ रोजीचे पत्र.

पुणे शहरातील महत्वाचा झोपडपट्टी भाग म्हणून काशेवाडी, लोहियानगर, हरकानगर चुडामण तालीम, डायसप्लॉट म्हणून ओळखला जातो या भागामध्ये तरुण व युवा मुलांचे व्यसनाधीन होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे. आपल्या पुण्याची तरुण पिढी वर पुढील भविष्य अवलंबून आहे म्हणून तरुण पिढी ही व्यसनाधीन न होता त्यांनी चांगले व उच्च शिक्षण घेवून स्वत:चे भविष्य उज्वल करणे आवश्यक आहे त्या दृष्टीने ठोस उपाय योजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

नुकतेच पुणे मनपा सार्वत्रिक निवडणूक पार पडल्या नंतर भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय बरखास्त करून त्याचे विलनीकरण हे कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय मध्ये करण्यात आले असून भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय येथील सर्व कार्यालये प्रशासन मार्फत कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय येथे स्तलांतरित करण्याची प्रक्रिया सुरु असल्याने सदर कार्यालय मध्ये मुबलक प्रमाणात मोकळी जागा उपलब्ध होणार असून कै. जनरल अरुण कुमार वैद्य स्टेडीयम शेजारील भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय मधील मोकळी जागा ही व्यसन मुक्ती केंद्र सुरु करणे करिता मोफत व आजीवन कालावधी स्वरुपात देण्यात यावे. जेणेकरून या भागातील व्यसनाधीन तरुणांची संख्या कमी होण्यास किंबहुना पूर्णतः व्यसन मुक्त होण्यास मदत होईल.

<u>विषय क्र. ११३ त्वर्य</u>

मा. अश्विनी डॅनियल लांडगे व मा.चंदूशेठ उर्फ रामचंद्र कदम (पक्षनेते, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष) यांचे दि.०४/०८/२०२६ रोजीचे पत्र.

पुणे महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती व समाज विकास विभाग यांच्या मार्फत पुणे शहरामध्ये स्मार्ट टॉयलेट संकल्पना राबविण्यात येत आहे. या संकल्पनेनुसार प्रभाग क्र. ६ क येरवडा-गांधीनगर मध्ये पुढील प्रमाणे सार्वजनिक सुलभ शौचालय हे स्मार्ट टॉयलेट करण्यात यावे. त्यापैकी

१. राज चौक कमानी शेजारील शौचालय
२. दीदार बेकरी शेजारील शौचालय
३. मदर तेरेसा हॉल शेजारील शौचालय
४. गजराज क्लब शेजारील शौचालय
५. फिरदोस मजिद शेजारील शौचालय

नगरसचिव
पुणे महानगरपालिका